आर.सी.सी.नं.२६४२/२०२५

**<u>एम.आय.डी.सी.भोसरी पो.स्टे.गु.र.नं. ६०२/२०२५</u>**

**भा.न्या.सं कलम ३१६(२), ३१८(२), ३३६(२), ३४०(२) ३(५) प्रमाणे**

## <u>जामिन अर्ज</u>

सदरचा जामिन अर्ज **गौरव उर्फ गोल्या संतोष कुमावत** याने भा.ना. सुरक्षा संहिता कलम ४८० अन्वये जामिन मिळणे कामी दाखल केला आहे.

**०२.** आरोपींचे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, सदर प्रकरणामध्ये आरोपीचा कोणताही सहभाग नाही. सदर गुन्हयाचा तपास पूर्ण झालेला असुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. आरोपी हा त्याच्या कुटुंबाचा कर्ता असुन त्याचे कुटुंबीय त्याचेवर अवलंबुन आहे. आरोपी हा न्यायालय नमुद करतील त्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहेत. सबब, आरोपीचा जामिन अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुतच्या अर्जावर अभियोग पक्षाने खुलासा सादर करत आक्षेप घेतला की, सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा व अजामीनपात्र आहे. सदर गुन्हयाचा तपास चालु असुन गुन्हयातील उर्वरीत मुद्देमाल जप्त करणे बाकी आहे. अटक आरोपी याचे टेम्पोतुन मुद्देमाल वाहतुक करुन विक्री करण्यात आला आहे. दाखल गुन्हयातील मुख्य आरोपीचा शोध घेणे बाकी आहे. सदर प्रकरणात तपास सुरु असुन आरोपीला जामिन मंजुर झाल्यास तो पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच साक्षीदारांवर दबाव आणणार किंवा सरकार पक्षाचा पुरावा नष्ट करण्याची किंवा पुराव्यामध्ये फेरफार करण्याची शक्यता आहे. त्यामुळे जामिन अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**०४.** रिमांड पेपरचे अवलोकन केले असता आरोपीला दिनांक २०/१०/२०२५ रोजी अटक करण्यात आली असुन तो दिनांक २६/१०/२०२५ पासुन न्यायालयीन कोठडीत आहे. सदर गुन्हयातील मुद्देमाल जप्त केलेला आहे. दोषारोपपत्र दाखल झालेले आहे. त्यामुळे आरोपी यास जेलमध्ये ठेवण्याची कोणतीही आवश्यकता याक्षणी दिसुन येत

नाही. आरोपी हा कुमावतनगर, पंचवटी, नाशिक येथील रहिवाशी असल्याचे दिसुन येत आहे. भविष्यामध्ये आरोपीची न्यायालयात उपस्थिती राहणे आवश्यक असल्यामुळे त्याला काही अटी व शर्तीवर जामीन देण्यात येते. वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **गौरव उर्फ गोल्या संतोष कुमावत** याचा जामिन अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. आरोपी याने रक्कम रु.५०,०००/– जामिन व तितक्याच रकमेचा मुचलका देण्यात यावा. आरोपीने स्थानिक जामीनदार दयावा.

३. आरोपीने कोणत्याही प्रकारे सरकारी साक्षीदारास धाकदपटशा करु नये.

४. आरोपीने अशा प्रकारचा गुन्हा करु नये.

५. आरोपीने तपासी अधिकारी यांना तपासकामी सहकार्य करावे तसेच गरज पडल्यास तपास अधिकारी सांगतील तेव्हा संबंधित पोलिस स्टेशन, येथे उपस्थित राहावे.

६. वरील नमुद केलेल्या अटींपैकी कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास आरोपीचा जामीन रद्द करण्यात येईल.

७. सदर आदेशाबाबत तुरुंगाधिकारी यांना व आरोपी यास मेल द्वारे तातडीने कळविण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN

Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2026.01.02 15:39:38 +0530

सत्यमेव जयते

पिंपरी, पुणे.
दि.०२.०१.२०२६

( एस.एस.चव्हाण)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पिंपरी, पुणे.